नि.दि.दा.क्रं. ७३/२०२५
मुक्ताबाई -वि- अशोक व इतर

**आदेश नि.क्रं.१०**
(पारीत दि. १२ माहे फेब्रुवारी सन २०२६)

सदरहु अर्ज वादीने दाव्यामध्ये प्रस्तावीत दुरुस्ती आदेश ६ नियम १७ दिवाणी प्रक्रिया संहिता अंतर्गत दाखल केलेला आहे.

२. सदरहु अर्ज व त्यावरील दाखल प्रतिवादीचे उत्तर वाचले आणि संपूर्ण अभिलेख पाहिला. प्रतिवादी व त्यांचे विधीज्ञ वारंवार पुकारा केला असता गैरहजर. वादीच्या वकीलांनी सदर अर्जावरील त्यांचे म्हणणे हेच त्यांचा युक्तीवाद ग्राहय धरण्यात यावा असे तोंडी सांगितले. सबब, सदरहू अर्ज गुणवत्तेवर निकाली काढत आहे.

३. वादीला दाव्यामध्ये प्रस्तावित दुरुस्ती दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. ५ च्या नावामध्ये दुरूस्ती करायची आहे. सदरहू दुरुस्तीमुळे त्यांच्या दाव्याचे स्वरूप बदलत नाही तसेच प्रतिवादींना कोणताही अपाय होणार नाही.

४. याउलट प्रतिवादींचे असे म्हणणे आहे की, वादीने बेकादेशीर अर्ज दाखल करून न्यायालयाचा वेळ खर्च करत आहे. अर्जामध्ये कोणतेही संयूक्त कारण नाही. त्यामुळे सदरचा दुरुस्ती अर्ज नामंजूर करण्यात यावा.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता वादीला करावयाची प्रस्तावीत दुरूस्ती ही प्रतिवादी क्र. ५ चे चूकलेले नाव दूरूस्ती करण्यासंबंधी आहे. प्रस्तावीत दुरुस्तीचे अवलोकन केले असता प्रस्तावीत दुरूस्ती मंजूर केल्यास प्रतिवादींना कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे सदरचा अर्ज प्रामाणिक हेतुने केलेला दिसतो. सदरची प्रस्तावीत दुरुस्ती योग्य न्यायनिर्णयाकरीता मंजूर होणे आवश्यक आहे. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१. अर्ज (निशाणी क्र.१०) मंजूर करण्यात येतो.
२. वादीने १४ दिवसाच्या आतमध्ये दाव्यात प्रस्तावीत दुरुस्ती करावी.

KUNDLIK SUDHAKAR KHANDARE
Digitally signed by KUNDLIK SUDHAKAR KHANDARE
Date: 2026.02.12 17:38:32 +0530

(के.एस. खंडारे)

दि. १२.०२.२०२६ सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),कंधार